ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २५ जुलै, १९५१ अंक ३०

## विविध माहिती

**जडजवाहिराचा लिलांव**—हैद्राबाद संस्थानमधील एका खानदान घराण्याची मालमत्ता कोर्ट ऑफ वार्डसच्या ताब्यांत होती. कोर्टानें घराण्यांतील जुन्या जडजवाहिराचा नुकताच लिलांव केला. तेव्हां, त्याची किंमत ८ लाख रुपये आली. लिलांवांत बोलण्यासाठी मुंबई, मद्रास, बिकानेर, दिल्ली इत्यादि ठिकाणाहून रत्नपारखी आले होते. हैद्राबाद शहरामधील एका बाईनेंच तीन-चतुर्थांश माल विकत घेतला.

**२०० साप अमेरिकेला रवाना**—कलकत्त्याहून सुमारें २०० विषारी नाग व साप अमेरिकेला विमानानें पाठविण्यांत आले. अमेरिकेंत मियामी येथें एक सर्पालय आहे. त्या ठिकाणीं पोलिओ रोगावर सर्पांच्या विषाचा कांय परिणाम होतो ह्यासंबंधीं संशोधन चालू आहे. संशोधनांत उपयोग करण्यासाठी सर्पालयाचे क्युरेटर मि. हॅसेट ह्यांनीं महिन्यापूर्वी ३०० साप नेले होते.

**महात्माजींच्या जीवनावर चित्रपट**—सुप्रसिद्ध निर्माते मि. पास्कल हे महात्माजींच्या जीवनावर एक चित्रपट काढण्याच्या विचारांत आहेत, असें समजतें. महात्माजींचें काम करणारा नट मिळण्याबाबतच खरी अडचण आहे. संकल्पित बोलपटांत चार्लस बॉयर हा नट पं. नेहरूंची भूमिका करणार आहे. कथानक श्री. तेंडुलकर हे हिंदी गृहस्थ लिहिणार आहेत. तें तयार होण्यास तीन महिने लागतील.

**कॅनडाची भारताला मदत**—कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडानें भारताला १ कोटी डॉलर्सची मदत करावयाची आहे. त्याशिवाय आणखी ५० लाख डॉलर्सची मदत मिळण्याचा संभव आहे असें समजतें. पहिल्या प्रतीचा गहूं, विजेचें साहित्य आणि इतर रोजच्या गरजेच्या वस्तु कॅनडाकडून भारताला मिळणार आहेत. पहिल्या १ कोटी डॉलर्सच्या रकमेंत सीलोन आणि पाकिस्तान ह्यांचाहि वाटा आहे.

**तांदूळ पिकविण्याचा प्रयोग**—२० फूट पाण्याखालीं पिकणारी आसाममधील तांदुळाची एक जात काश्मीरमध्यें लावण्याचा प्रयोग करण्यांत येत आहे. तो यशस्वी ठरला तर काश्मीरांतील हजारो एकर दलदलीच्या प्रदेशांत ही जात लावता येईल.

**शेक्सपिअरच्या स्मरणार्थ नाटकगृह**—शेक्सपिअरच्या स्मरणार्थ ब्रिटिश नॅशनल थिएटरचा पायाभरणी समारंभ नुकताच करण्यांत आला. हें नाटकगृह टेम्स नदीच्या दक्षिण तीरावर बांधण्यांत येत आहे. शेक्सपिअरच्या काळांत ज्या ठिकाणीं त्या वेळचें प्रसिद्ध ग्लोब थिएटर होतें, तेथून जवळच ही जागा आहे. हें जुनें थिएटर १६१३ सालीं अग्निप्रलयांत नाश पावलें होतें.

**ट्यूब वेल्स खणण्यासाठी ५ कोटी रुपये**—उत्तर प्रदेश बिहार आणि पंजाब ह्या राज्यांतून ट्यूब वेल्स खणण्यासाठी ५ कोटी रुपये खर्च करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविल्याचें समजतें. उत्तर प्रदेशांत ४४०, बिहारमध्यें ३०० आणि पंजाब मध्यें २२५ विहिरी खोदण्यांत येणार आहेत. कामाचें कंत्राट एका ब्रिटिश-अमेरिकन कंपनीला देण्यांत आलें आहे. १९४८ ते ५० ह्या दोन वर्षांत भारतांत अशा २९० विहिरी खोदण्यांत आल्या. ५५० विहिरी खोदण्याचें ठरविण्यांत आलें होतें.

**जंगली जनावरांपासून पिकांचें संरक्षण**—जंगली जनावरांपासून पिकांचें रक्षण करण्याची एक योजना आसामच्या सरकारनें आंखली आहे. ही मोहिम विशेषतः हत्ती आणि माकडे ह्यांच्या विरुद्ध चालणार आहे. एका हत्तीच्या शिकारीला ५० रुपये आणि माकडाच्या शिकारीला ८ रुपये देण्यांत येणार आहेत. शिकाऱ्यांना दारूगोळा फुकट पुरविण्यांत येईल. आसाममध्यें ह्या प्राण्यांच्या उपद्रवामुळें दरवर्षी शेकडो टन अन्नधान्य नाश पावतें.

**१०,००० लघुलेखकांना वाव आहे**—जोहान्सबर्ग येथील व्यापारी कंपन्यांचा बराच पत्रव्यवहार तुंबून राहिला आहे. तो निकालांत काढण्यासाठी ब्रिटनमधून १०,००० स्त्री लघु-लेखिका आणण्यांत याव्या असें लंडनमधील डेली एक्सप्रेसच्या जोहान्सबर्ग येथील वार्ताहरानें सुचविलें आहे. सध्या जोहान्सबर्गमध्यें टंकलेखक आणि लघुलेखक ह्यांचा अतिशय तुटवडा आहे. ह्या नोकरांना त्यांची बारिकशी चूक दाखविण्याचीहि सोय उरलेली नाहीं. चूक दाखवितांच राजीनामा देऊन ते दुसरी चांगली नोकरी पटकावूं शकतात !

**घरगुती काळज्यांचे बळी**—भारतामध्यें सुमारें ७,००,००० लोक असे आहेत कीं त्यांना सरोखर वेड्यांच्या इस्पितळांतच ठेवावयास पाहिजे. एकूण ७,१०,००० वेड्यांपैकीं अवघे १२,३०४ इस्पितळांत आहेत. पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें वेड लागण्याची प्रवृत्ति अधिक आढळून आली आहे. पुरुष वेड्यांच्या संख्येंत ९·८ टक्के वाढ झालेली आहे, तर वेड्या स्त्रियांच्या संख्येंत १७·६ टक्के वाढ झाली आहे. वेड्यांच्या इस्पितळांवर गेल्या वर्षी ६३,६२,००० रुपये खर्च झाले. फीच्या रूपानें ८,५८,००० रुपये जमा झाले. मुख्यतः घरगुती काळज्यांमुळें वेड लागतें, असें दिसून आलें आणि घरांतील काळज्यांत बेकारी हे एक प्रमुख कारण आहे असें आढळून आलें आहे.

## श्री लक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

### रजत महोत्सव ग्रंथ

१ फेब्रुवारी, १९२६ ह्या दिवशीं स्थापन झालेल्या श्री लक्ष्मी सें. को. बँकेचा रजत महोत्सव १ जून, १९५१ रोजीं मुंबई सरकारचे अर्थ-सहकार मंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. त्यानिमित्त रजत महोत्सव समितीतर्फे तिचे अध्यक्ष श्री. वि. शं. झिरपे, बी. ए., एलएल. बी. (बँकेचे चेअरमन) ह्यांनीं रजतमहोत्सव ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. बँकेच्या स्थापनेपासून गेल्या २५ वर्षांत तिची प्रगति कशी होत गेली, ह्याची सविस्तर व सचित्र माहिती ग्रंथांत देण्यांत आली आहे. निवेदन, फलटणचा संक्षिप्त इतिहास, फलटण तालुक्याची भौगोलिक माहिती, बँकेच्या स्थापनेपासूनचा इतिहास, बँकेची आर्थिक परिस्थिति, बँकेच्या कारभाराची व्यवस्था, तालुक्यांतील सहकारी संस्था आणि १७ परिशिष्टें असे ग्रंथाचे ८ भाग असून त्यांत आकडेवार माहिती दिलेली आहे. फलटण दरबारनें ही बँक म्हणजे संस्थानच्या राज्यकारभाराचें एक महत्त्वाचें अंग मानून तिच्या देखरेखीची व नियंत्रणाची व्यवस्था केली आणि बँकेच्या कर्जासाठी व डिव्हिडंडसाठी हमी देऊन बँकेविषयीं लोकांत विश्वास निर्माण केला. श्री. राजेसाहेब हे बँकेचे प्रेरक व संस्थापक, तर श्री. सौ. राणीसाहेब (ज्यांचें नांव बँकेस दिल्याचें उद्घाटनप्रसंगीं जाहीर करण्यांत आलें होतें) ह्या तिचें सौभाग्य होत, असें मार्मिक वर्णन श्री. झिरपे ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत केलेलें आहे. विलिनीकरणानंतरच्या बदललेल्या परिस्थितींतहि संचालक मंडळानें बँकेच्या वाढत्या क्षेत्रास अनुरूप अशा योजना आखून तिची प्रगति कायम राखली आहे. सध्याचे चेअरमन श्री. झिरपे हे १९४४-४५ पासुन बँकेचें मार्गदर्शन करीत आहेत आणि व्यवस्थापक श्री. श्री. ह. तळवलकर, ए. सी. आर. ए., ह्यांनीं ५-९-१९२७ पासून बँकेशीं एकरूप होऊन तिच्या कारभारास वळण लावलें आहे. बँकेच्या भागांच्या वसूल भांडवलाच्या मानानें तिनें निर्माण केलेले फंड सुमारें अडीच पट झालेले आहेत, ठेवींच्या रकमेंत शेतकरी खातेदार ह्यांची खातीं अधिक असून एकूण ठेवींच्या रकमेंत त्यांच्या रकमांचें प्रमाण अधिक पडत आहे, इत्यादि गोष्टी विशेष उल्लेखनीय आहेत. रजतमहोत्सव ग्रंथाची पृष्ठसंख्या ५२ असून सुमारें ६० छायाचित्रें, अनेक तक्ते, इत्यादींनीं तो आकर्षक करण्यांत आला आहे.

---

**चहांतील भेसळीचा परिणाम**—कलकत्त्यामधील एका प्रसिद्ध कंपनीला चहांत भेसळ केल्याबद्दल नुकतीच शिक्षा झाली होती. त्याचा परिणाम कलकत्त्यामधील चहाच्या लिलावावर होऊन भारताला २५ लाख रुपयांच्या परकीय हुंडणावळीला मुकावें लागलें. निर्गत चहाच्या लिलांशाच्या वेळीं २५,००० चहाच्या पेट्या विक्रीस ठेवण्यांत आल्या होत्या. परंतु त्यापैकीं १२,५०० पेट्याच काय त्या खपल्या.

**वैद्यकीय मोटारीची देणगी**—अ. भारतीय महिला परिषदेनें मलबार जिल्हा बोर्डाला वैद्यकीय मदत खेडेगांवीं पोचविणारी एक फिरती मोटार देऊं केली आहे. मोटारीची किंमत १४,००० रुपये असून ती गांवोगांवीं फिरविण्यासाठीं दरमहा १,००० रुपये खर्च येईल. बोर्ड हा खर्च करण्यास तयार असेल तरच मोटार देऊं केली आहे. बोर्डानें मोटारीचा साभार स्वीकार केला आहे.


दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |


: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.



'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार





# अर्थ

बुधवार, ता. २५ जुलै, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँका व त्यांचे नोकर ह्यांचा औद्योगिक तंटा

बँका आणि त्यांचे नोकर ह्यांच्यामधील औद्योगिक तंटे उभयपक्षीं विचारविनिमय करून मिटविणें आवश्यक आहे. परंतु ते तसे न मिटल्यास औद्योगिक कोर्टातर्फे ते मिटविणें जरूर होतें. बँकांचे मालक, नोकरांचे संघ आणि बँकेशीं व्यवहार करणारी जनता ह्या सर्वांच्याच दृष्टीनें तंट्याचा समाधानकारक निकाल लागणें आवश्यक असतें. तथापि, ह्या तंट्यांच्या बाबत बँक ट्रायब्यूनलनें जो निकाल दिला आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं अजून समाधानकारक मार्ग सांपडलेला नाहीं. निकालामुळें बँक कामगारांना संरक्षण मिळालें आहे, आणि बँकांशीं व्यवहार करण्याच्या वेळा कमी झाल्या आहेत. मूळ निकालावर एका बँकेनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, परंतु तें यशस्वी न झाल्यामुळें सुप्रीम कोर्टाकडे अपील करण्यांत आलें. सुप्रीम कोर्टानें निकाल रद्द व बेकायदेशीर ठरविला. सुप्रीम कोर्टाच्या ह्या निर्णयासंबंधीं बँक-कामगारांतर्फे असा आक्षेप घेण्यांत आला कीं, वरील निर्णय केवळ तांत्रिक मुद्यावर आधारलेला आहे; आणि म्हणून मूळ निकाल नवा कायदा करून पक्का करण्यांत यावा असेंहि सुचविण्यांत आलें. त्यानंतर बँकांचे मालक, नोकरांचे प्रतिनिधी, मध्यवर्ती सरकारचें मजूर-खातें, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि मध्यवर्ती सरकारचें फडणिशी खातें ह्या सर्वांच्या प्रतिनिधींची एक परिषद् गेल्या मे महिन्यांत भरविण्यांत आली. परिषदेनें असें ठरविलें कीं एक कन्सिलिएशन बोर्ड नेमावें. वादाचे जे प्रश्न बोर्डाला त्याच्या स्थापनेपासून दोन महिन्याच्या आंत सोडविता येणार नाहींत, ते एका नव्या ट्रायब्यूनलकडे सोपविण्याचें ठरलें, दरम्यान बँकांनीं १ एप्रिल, १९५१ पर्यंत जे पगार व भत्ते इत्यादि देण्यांत येत होते ते तसेंच पुढें चालू ठेवण्याचें कबूल केलें. ह्या सर्व व्यवस्थेला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस बिलहि (दुरुस्तीच्या व तात्पुरत्या स्वरूपाचें) ता. ८ जून रोजीं मंजूर करण्यांत आलें.

इतकें सगळें करूनहि आजची परिस्थिति कोणालाच समाधानकारक वाटत नाहीं. बँक नोकर त्यांच्या भवितव्याविषयीं चिंताग्रस्त आणि असंतुष्ट आहेत; बँकांचे चालकहि शंका-कुशंकांनीं व्याप्त झालेले आहेत. सुप्रीम कोर्टाचा निर्णय लक्षांत घेऊन वादांत गुंतलेल्या प्रतिस्पर्ध्यांचे हक्क काय आहेत तें स्पष्ट करणें जरूर होतें. त्याचप्रमाणें कन्सिलिएशन बोर्डापुढें कोणती कार्यक्रमपत्रिका असावी आणि तीवर कोणते मुद्दे असावे ह्या संबंधींहि निश्चितता असली पाहिजे. परंतु ह्या सर्वच बाबींसंबंधीं बरीच संदिग्धता दिसून येते. बँका व त्यांचे नोकर ह्यांचे संबंध स्थिर आणि उभयतांना इष्ट वाटेल अशा पायावर उभारणें अत्यावश्यक आहे. भारतांतील बँकांचा व्यवसाय हा आज तरी खाजगी मालकीचा आहे. परंतु म्हणून ह्या व्यवसायाच्या अडचणीहि खाजगी स्वरूपाच्या आहेत असें म्हणतां येत नाहीं. कारण, बँकांचे व्यवहार हे जनतेच्या सोयीसाठी मुख्यतः असतात. ह्या वर्षीच्या जामेवारी-फेब्रुवारी महिन्यांत आयर्लंडमधील बँकांत औद्योगिक तंटे उपस्थित झाले. त्याचा इतिहास लक्षांत घेण्यासारखा आहे. भारत आणि आयर्लंड ह्या दोन्ही देशांत लोकसंख्येच्या मानानें नव्हे, पण व्यवहाराच्या मानानें अधिक बँका झालेल्या आहेत. यामुळें आयर्लंडमधील बँकांचे खर्च वाढलेले आहेत. त्याचा परिणाम असा झाला कीं, आयर्लंडमधील बँकांना आपल्या नाममात्र चाललेल्या कांहीं शाखा बंद कराव्या लागल्या. तशीच परिस्थिती भारतांत हळुहळु निर्माण होत आहे. शाखा बंद केल्यामुळें कारकुनांच्या जागा कमी होत आहेत आणि जनतेला उपलब्ध असलेल्या सोयीहि आखडत चालल्या आहेत. तथापि, परदेशी बँका आणि भारतांतील बँका ह्यांच्यांत एक महत्त्वाचा फरकहि आहे. भारताशिवाय इतर कोठल्याहि देशांत बँकांतील कारकुनांचा कामाचा आठवडा ३६ तास इतका कमी नाहीं. कांहीं देशांत तर इतकें कमी काम अचिंतनीयच वाटेल. ठरलेल्या कामाच्या वेळापेक्षां अधिक काम करून घेण्यावर भारतांत बंधनें घालण्यांत आलेलीं आहेत. त्यामुळें बँकांच्या तंट्याबाबत जो मूळ निकाल देण्यांत आला आहे तो बँकांना आणि बँकांशीं व्यवहार करणाऱ्या लोकांना जाचक होत आहे, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

मुंबईतील हिंदी व एक्सचेंज बँकांनीं सेन अवार्डच्या पूर्वींचे बँकिंग व्यवहाराचे तास (१०-३० ते २-३०) हल्लींच्या (१०-४५ ते २-१५) ऐवजीं पुनः सुरू करण्याचें ठरविलें होतें. सध्यांच्या वेळा व्यापारी वर्गाला गैरसोईच्या आहेत हें लक्षांत घेऊन हा बदल सोमवार ता. २३ पासून करण्यांत यावयाचा होता. परंतु, आतां नव्या ट्रायब्यूनलची नेमणूक करण्यांत आली आहे आणि इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टाच्या ३३ व्या कलमाप्रमाणें, ट्रायब्यूनलकडे तंटा गेला असतांना कामाचे तास वाढवितां येत नाहींत. त्यामुळें कामाच्या तासांतील वाढ स्थगित होणार आहे. ट्रायब्यूनलवर नोकरवर्गाकडून बहिष्कार घातला जाणार, असा रंग दिसतो. २७ ऑगस्टपासून बँकांचा नोकरवर्ग रेल्वे कामगाराप्रमाणेंच संपावर जाण्याचा संभव आहे. ट्रायब्यूनलकडून न्याय मिळणार नाहीं, असें नोकरवर्गाच्या संघाचें म्हणणें आहे.

### डॉ. शाख्ट इंडोनेशियास सल्ला देणार

हिटलरचे हिकमती आर्थिक सल्लागार डॉ. शाख्ट ह्यांनीं इंडोनेशियाच्या सरकारास आर्थिक प्रश्न सोडविण्याचे कामीं मदत करण्याचें मान्य केलें आहे. ते २ ऑगस्ट रोजीं जाकर्तीला पोंचतील. १९ जुलै रोजीं ते रोमहून निघाले. वाटेंत कैरो, कलकत्ता, बँकॉक व सिंगापूर येथें ते थोडा थोडा मुक्काम करतील.

### नव्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँक लवकरच १० आणि १०० रु. वाल्या नव्या चलनी नोटा काढणार आहे. त्यांवर इंग्रजी इतक्याच प्रमुख रीतीनें हिंदीमध्यें नोटांची किंमत छापलेली असेल. बाकी फारसा फरक करण्यांत येणार नाहीं. १०० रुपयेवाल्या नोटेवरील देखाव्यांतील झाडें अधिक स्पष्ट करून कमळांचें तळेंहि चित्रित केलें जाईल.

## कोणतें अधिक महाग ?

### आरोग्य, कीं आजारपण ?

सध्यां जगाची जी लोकसंख्या आहे, त्यांपैकीं एक पंचमांश लोकसंख्या विकास झालेल्या भूभागांत वस्ती करून आहे. ह्या भूभागांत रहाणाऱ्या व्यक्तींचें दरडोई दरवर्षी उत्पन्न सुमारें ५०० डॉलर्स अथवा १६५० रुपये आहे. प्रत्येकाची आयुर्मानाची सरासरी अपेक्षा ६३ वर्षें वयाची आहे. आतां अविकसित भूभागांतील लोकांची दैन्यावस्था पहा. अविकसित भूभागांत जगांतील दोन तृतीयांश लोकसंख्या रहाते, लोकांचें सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे ५० डॉलर्स अथवा १६५ रुपये आहे आणि आयुर्मानाची सरासरी अपेक्षा ३० वर्षांची आहे. हीं दोन परस्परविरोधीं चित्रें डोळ्यासमोर धरलीं म्हणजे मागासलेल्या भूभागांची आर्थिक उन्नति साधणें किती महत्त्वाचें आहे तें स्पष्टपणें लक्षांत येतें. ही उन्नति झाल्याशिवाय अधिक संपन्न आणि स्थिर असें नवें जग निर्माण करणें अशक्यप्राय वाटतें.

संयुक्त राष्ट्रसंघानें तांत्रिक मदत देण्याचा जो कार्यक्रम आंखला आहे त्याचा उद्देश वरील भूप्रदेशांची आर्थिक प्रगति साधण्याचाच आहे. अर्थात्, ही प्रगति साधतांना शेतकी, उद्योगधंदे, शिक्षण, समाजशास्त्र, इत्यादि अनेक दृष्टींनीं विचार होईल ह्यांत शंका नाहीं. परंतु ह्या सर्व दृष्टिकोनापेक्षां आरोग्याची तरतूद करण्याच्या दृष्टीनें प्रथम विचार व्हावयास पाहिजे. ज्या प्रकारच्या आजारांना निश्चित उपाय सांपडलेले आहेत असे आजार तरी थांबविण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. कारण, दारिद्र्य आणि दुःख हीं निवारण्यासाठीं निरोगी लोकांची गरज पहिली आहे. ह्यासंबंधीं ग्रीकचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. ग्रीसमध्यें १९४२ सालीं २० लाख लोकांना हिंवतापानें पछाडलेलें होतें. हिंवतापाच्या उगमाविरुद्ध ग्रीसमध्यें जोराची मोहीम संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे करण्यांत आली. त्याचा परिणाम १९४९ सालीं ठळकपणें दिसून आला. त्या सालीं अवघ्या ५०,००० लोकांना हिंवतापाचा आजार झाला. ग्रीसमधील जनतेला एकट्या केवळ क्विनिनसाठीं दरवर्षी १३,००,००० पौंड खर्च करावे लागत होते. उलटपक्षीं, मलेरिया-प्रतिबंधक उपाय व डी. डी. टी. चा उपयोग ह्यांना दर वर्षी फक्त ३,००,००० पौंड खर्च आला. ग्रीसमधील लोकांची हिंवतापासून सुटका झाल्यामुळें त्या देशांच्या लोकसंख्येंत काम करूं शकणाऱ्या १,५०,००० कामगारांची भर पडल्यासारखें झालें आहे. सार्डिनिआमध्येंहि हिंवतापाच्या सांथी मोठ्या प्रमाणावर येत असत. त्या रोगाविरुद्ध प्रतिबंधक उपाय योजल्यामुळें आतां तो जवळ जवळ नाहींसाच झाला आहे. इटलीमध्यें लोकसंख्या फार झाल्यामुळें तेथील १०,००० लोक सार्डिनिआंत हलविण्याचा विचार आतां करण्यांत येऊं लागला आहे. सीलोनमध्येंहि हिंवताप प्रतिबंधक उपाय अमलांत आणण्यांत येत आहेत. त्यामुळें दरवर्षी सुमारें ५०,००० लोकांचे प्राण वाचतात असा अंदाज आहे, आणि उपायांना खर्चहि फार येत नाहीं. दर माणसामागें २२ सेंटस अथवा १० आणे इतक्या अल्प खर्चांत काम भागतें. मलायामध्यें एका रबराच्या मळ्यावरील बहुतेक मजुरांना हिंवतापानें जर्जर केलें होतें. रोगग्रस्त होऊन कसें तरी जगत असलेल्या ह्या मजुरांचें हिंवताप प्रतिबंधक उपायांनीं पुनरुज्जीवनच केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां हे सर्व लोक सुखी कौटुंबिक जीवन जगत आहेत. त्यांच्या आरोग्याचा सुपरिणाम मळ्याच्या रबराच्या उत्पादनावरहि झाला आहे. रबराचें उत्पादन जवळ जवळ सात पटींनें वाढलें आहे. अमेरिकेंत सार्वजनिक आरोग्याला अतिशय महत्त्व देण्यांत येतें. 'सार्वजनिक आरोग्य विकत घेतां येतें.' असें घोषवाक्यच अमेरिकेंत प्रचलित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक आरोग्य संघटनेनें आतांपर्यंत जें काम केलें आहे, त्यावरून असें उघड दिसून येतें कीं आजारी पडून द्यावी लागणारी किंमत हा आरोग्यासाठीं दिलेल्या किंमतीपेक्षां किती तरी पटींनें मोठी असूं शकते. निरोगी लोकच धनोत्पादनाच्या कार्यांत उपयोगी पडत असल्यामुळें, जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्याचें महत्त्व मानावें तितकें थोडेंच होईल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

### सावकारी कायदा जुन्या कर्जास लागू नाहीं
### ( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

मेसर्स साजनलाल जव्हेरिलाल आणि कं. (वादी) नें २८ जुलै, १९४८ रोजीं गुलाबचंद केसरीचंद ह्यास इक्विटेबल मॉर्टगेजवर ४२,००० रु. कर्जाऊ दिले होते. व्याजाचा दर दरमहा दर शेकडा १ रु. ठरला होता. वादीनें कर्जाची रक्कम परत मागितली ती प्रतिवादीनें न दिल्याकारणानें वादीनें दावा लावून ४२,००० रु. मुद्दल व १६,६४० रु. व्याज अशा १८ ऑक्टोबर, १९५० अखेरच्या येण्याची मागणी केली.

बॉंबे मनिलेंडर्स ॲक्ट नोव्हेंबर, १९४७ पासून अंमलांत आला आणि सरकारनें डिसेंबर, १९४७ मध्यें नोटीफिकेशन काढून तारणावरील कर्जाच्या व्याजाचा दर ६% निश्चित केला. प्रतिवादीनें आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ त्या कायद्याचें २५ ( २ ) हें कलम पुढें केलें. त्या कलमाप्रमाणें, सरकारनें ठरवून दिलेल्या कमाल दरापेक्षां जास्त व्याजाचा दर बेकायदा असून, ज्या दाव्यास प्रस्तुत कायदा लागू आहे, अशा दाव्यांत त्या दरापेक्षां ज्यास्त व्याज देवविण्यास कोर्ट समर्थ नाहीं. "कायद्याची भाषा व संदर्भ लक्षांत घेतां, कायदा अंमलांत येण्यापूर्वींच्या कर्जास व्याजावरील नियंत्रण लागूं व्हावें असा उद्देश दिसत नाहीं. 'ज्या दाव्यास हा कायदा लागू आहे' ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ, 'ज्या दिवशीं कायदा अंमलांत आला, त्यानंतर दिलेल्या कर्जाच्या वसुलीचा दावा' असाच लावला पाहिजे. साधारणतः सर्व कायदे मागाहून घडणाऱ्या गोष्टींवर बंधनकारक असतात. नागरिकांचे पूर्वीचे हक्क काढून घेण्याचा हेतु कायद्यांत स्पष्टपणें नमूद केलेला असल्याविना तो गृहीत धरतां येणार नाहीं." असें न्या. शहा ह्यांनीं विवेचन करून वादीच्या बाजूनें निवाडा केला.

**काश्मीरमध्यें ॲट्रोपिनचा कारखाना ?**—काश्मीरच्या वनस्पति संशोधन संस्थेला लडाकमध्यें एक प्रकारची औषधी वनस्पति सांपडली आहे. ह्या वनस्पतीचा उपयोग करून काश्मीरमध्यें ॲट्रोपिनचा एक कारखाना काढण्याचें घाटत असल्याची बातमी आहे.

## टाटा ऑईल मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी ४,०४,००,०९६ रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. त्यांत ३,२८,०९,१५० रु. चे साबण व ग्लिसरीन, ३१,४९,४९ रु. चीं खाद्यतेलें (कोकोजेम, पकाव, इ.) व ४४,४१,४०८ रु. चीं सौंदर्य प्रसाधनें (सुवासिक तेलें, यू-डि-कलोन, इ.) होतीं. इतर उत्पन्न जमेस धरून व सर्व खर्च वजा जातां ५,४५,३१७ रु. नफा उरला. खर्चाचे बाजूस डायरेक्टरांची फी फक्त १,७०० रु. आहे. मॅनेजिंग एजंटांचा ऑफिस अलावन्स १२,००० रु. असून त्यांचें कमिशन १,२२,६३६ रु. झालें. सिलोन, मलाया, इत्यादि ठिकाणचें खोबरें फार महाग झाल्यामुळें मुंबई येथील कारखान्यांतील खोबरें गाळण्याचें काम वर्षभर बंदच होतें. तथापि, अलेप्पी येथें खरेदीचें केंद्र उभारून टाटापुरम कारखान्यानें स्थानिक खोबरें मोठ्या प्रमाणावर गाळलें. भुइमुगाचे दाणे मुळीच गाळले नाहींत; कारण भुइमुगाचें तेल आयतें विकत घेणें स्वस्त पडलें. कोरियन युद्धामुळें नंतर विशेष, परंतु युद्धसमाप्तीनंतर आतांपर्यंत तेलाच्या किंमती किती भरमसाट वाढल्या, हें खालील तक्ता दर्शवितो.

प्रत्येक टनाची किंमत

| वर्ष | खोबरेल | भुईमुगाचें तेल | मोहोरीचें तेल |
|---|---|---|---|
| १९३८-३९ | २२२ | २२२ | ३१० |
| १९४५-४६ | ११६८ | ८०७ | १२२३ |
| १९४८-४९ | १६७२ | १३६६ | १५९९ |
| १९५०-५१ | २२९३ | १८२४ | १८१७ |
| १९३८-३९ चे म.नानें १९५०-५१ मध्यें वाढ | ९३३ % | ७२१ % | ४८६ % |

आग्नेय आशियांतील देशांत कंपनीच्या मालास कितपत वाव आहे ह्याची पहाणी करण्यासाठी कंपनीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला तिकडे पाठविण्यांत आलें. कंपनीचा माल तिकडे निर्गत करतां येण्याजोगा आहे, असें आढळून आलें. टाटा केमिकल्सचा चीफ विक्री एजंट म्हणून टाटा ऑइल मिल्स काम करते.

कंपनीचे हाताखालीं एकूण ३,१७५ कामगार आहेत. त्यांपैकीं १०% कामगार २० वर्षांपेक्षां जास्त, ४५% कामगार १० ते १९ वर्षें, ३०% कामगार ५ ते ९ वर्षें व १४% कामगार ५ वर्षांपेक्षां कमी काळ कंपनीकडे कामावर आहेत.

कंपनीच्या ५,७७६ ऑर्डिनरी शेअरहोल्डर्सपैकीं १ ते ५ शेअर्स धारण करणारांची संख्या ३८.८% आहे, ६ ते १० शेअर्सचे मालक २९.५% आहेत, ११ ते २० शेअर्स धारण करणारे १६.५% आहेत व २१ ते ५० शेअर्सची मालकी १३.१% लोकांचेकडे आहे. २३१० प्रेफरन्स शेअरहोल्डर्सपैकीं ७३.४% भागीदारांजवळ १ ते ५ शेअर्स आहेत, १२.८% भागीदारांजवळ ६ ते १० शेअर्स आहेत आणि ५.५% भागीदारांजवळ ११ ते २० शेअर्स आहेत.

**कंपनीचा ताळेबंद**

| | लक्ष रु. | | लक्ष रु. |
|---|---|---|---|
| भांडवल व प्रीमिअम | ११४.९० | इमारती, यंत्रें, इ. | १४४.६२ |
| फंडस व रिझर्व्हज | ७५.०० | स्टॉक्स व स्टोर्स | १६८.०९ |
| कर्जें व ठेवी | १०७.१८ | येणीं | २७.०३ |
| इतर देणीं | ६९.५६ | अडव्हान्सेस, डिपॉझिटस | २२.८२ |
| पुढें ओढलेला नफा | ५.६४ | रोख व बँकांत | ९.७१ |
| एकूण रु. | ३७२.२८ | एकूण रु. | ३७२.२८ |

## ब्रिटनमधील चढत्या किंमती : व्यापारी संघांचा जुलूम

ब्रिटनमध्यें पदार्थांच्या किंमती चढूं लागल्यामुळें ब्रिटिश सरकारला चिंता वाटूं लागली आहे. मजूर पक्षाचे एक पार्लमेंटरी सेक्रेटरी मि. कॅलाघॅन म्हणाले कीं, बडे भांडवलवाले जागतिक परिस्थितीचा फायदा घेऊन गरीब माणसाच्या खिशांतील पैसा काढून घेत आहेत. ब्रिटनचे स्थानिक स्वराज्य-मंत्री मि. डाल्टन ह्यांनीं किंमतीवरील नियंत्रणें अधिक कडक करण्यांत येतील असा इशारा दिला आहे. ते पुढें म्हणाले "कांहीं व्यापाऱ्यांना किंमती कमी करण्याची इच्छा आहे, परंतु व्यापाऱ्यांचे संघ त्यांनीं तसें न करण्यासाठी दडपण आणीत आहेत. हा जुलूम आम्हीं चव्हाट्यावर मांडल्याशिवाय रहाणार नाहीं. मोठ्या व्यापाऱ्यांच्या ह्या कारवायांना छोटे व्यापारी बळी पडतात. सहकारी संस्था आपल्या गिऱ्हाइकांना वस्तूंच्या खरेदीवर नफा देतात त्यामुळें त्यांना मालाचा पुरवठा करण्याचें नाकारण्यांत येतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं बऱ्याच वस्तूंसाठी ब्रिटिश गृहिणींना फार किंमती याव्या लागतात. नफेबाजांची हुकूमशाही नाहींशी केली पाहिजे, आणि मालाचे वांटप करणाऱ्या संस्थांची कार्यक्षमता वाढविली पाहिजे. स्वयंसेवक पद्धतीनें लोकांना माल पुरविणाऱ्या दुकानांचे प्रयोग करण्यास भरपूर वाव दिला पाहिजे. तथापि, ह्याचा अर्थ आपआपसांत घातक स्पर्धा करून खरेदीपेक्षांहि कमी दरांत माल देण्याची मोकळीक द्यावी असा मात्र नाहीं. ह्या पद्धतीनें सर्वांचाच घात झाल्याखेरीज रहात नाहीं. गेल्या कांहीं महिन्यांत कारखानदारांचे आणि घाऊक व्यापाऱ्यांचे नफे फुगत चालले आहेत. गेल्या पांच महिन्यांत १,३०० कंपन्यांनीं मिळून सुमारें ७० कोटी पौंडांचा नफा जाहीर केला. गेल्या वर्षी तत्सम नफ्याचा आकडा सुमारें ५८कोटी पौंड होता. १९५०सालच्या मे महिन्यांत पौंडामागें जितका नफा होत असे, त्यापेक्षां १९५१ सालाच्या मे महिन्यांत दर पौंडामागें ५ शिलिंग ६ पेन्स अधिक नफा होऊं लागला आहे" कोरियांतील युद्ध बंद झालें तरी ब्रिटनमध्यें शस्त्रास्त्रांची निर्मिती पूर्वीप्रमाणेंच चालू ठेवण्याचें जाहीर झालेलें आहे. अशा परिस्थितींत किंमतीवर नियंत्रणें ठेवूनहि कितपत उपयोग होईल ह्याची शंका वाटते.

---

**विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अभ्यास**—उत्तर प्रदेश सरकारनें आठ तज्ज्ञ शिक्षण-व्यावसायिकांची एक कमिटी नेमली आहे. डॉ. हेकरवाल ह्यांनीं विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अभ्यास करून जो अहवाल सरकारला सादर केला आहे त्यांतील शिफारसी कितपत अंमलांत आणतां येतील ह्यासंबंधीं कमिटी विचार करणार आहे. लखनौमधील सुमारें ७,००० विद्यार्थ्यांना १५० प्रश्नांची एक पत्रिका पाठवून आलेल्या उत्तरावर वरील अहवाल आधारलेला आहे.

**भारतीय अनुबोध-पट परदेशीं दाखविणार**—भारतीय सरकारच्या वहातूक खात्यानें कांहीं हिंदी अनुबोधपट परदेशीं दाखविण्यासाठीं पाठविले आहेत. परदेशी प्रवाशांना ज्या विषयाबद्दल कुतूहल वाटतें, त्यासंबंधींचे बोलपट निवडण्यांत आले आहेत. 'राजस्थानमधील शहरें,' 'काश्मीरचें सौंदर्य' इत्यादि प्रेक्षणीय बोलपट ब्रिटनमधील औद्योगिक प्रदर्शनांतहि दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

## रबराच्या किंमतींत वाढ

जागतिक रबराच्या किंमतीच्या मानानें हिंदमधील रबराच्या किंमती फारच कमी आहेत व त्यामुळें मळेवाल्यांना धंदा परवडत नाहीं अशी तक्रार आहे. मध्य सरकारनें रबराच्या किंमतीच्या बाबतींतील टॅरिफ बोर्डानें केलेल्या चौकशीचा अहवाल विचारांत घेऊन रबराची किंमत दर १०० पौंडामागें ५॥ रुपये याप्रमाणें वाढवून ती १०० पौंडाला १२८ रुपये इतकी ठरविली आहे. परंतु ही किंमत निदान १०० पौंडाला १५० रुपये इतकी ठेवावयास पाहिजे होती असें मळेवाल्यांचें म्हणणें आहे. सिंगापूर व कोलंबो येथें रबराची किंमत अनुक्रमें १८२ व १७५ रुपये या प्रमाणें आहे. हिंदमध्यें तयार होणारा रबर अंतर्गत रीत्या खपतो. रबराला मागणी वाढत्या प्रमाणांत आहे. परंतु सरकारनें ठरवून दिलेले मजुरांचे वाढते दर, सरकारी कर व इतर बंधनें यांमुळें मळेवाल्यांना धंदा करणें उत्साहाचें वाटत नाहीं असें मळेवाल्यांचें म्हणणे आहे. वाढत्या जागतिक बाजारभावांचा फायदा या धंद्याला मिळाला पाहिजे असें मळेवाल्यांना वाटतें. गेल्या नऊ महिन्यांत सरकारनें दर शंभर पौंडाला ९० रुपयांपासून १२८ रुपयांपर्यंत रबराची किंमत वाढविण्याची परवानगी दिली आहे किंमत कमी असल्यामुळें गेल्या वर्षांत पुष्कळसा रबर सांठवून ठेवण्यांत आला आहे व आतां किंमत वाढविल्यामुळें त्याचा खप होऊन मळेवाल्यांचा फायदा होईल.

---

## भाताच्या लागवडींत सुधारणा करण्यासाठी कर्जें

### कृत्रिम खतासंबंधींची अट काढून टाकली

सुधारलेल्या पद्धतीनें भाताची लागवड करण्यासंबंधींच्या योजनेखालीं तगाईकर्जें देण्याच्या बाबतींत शेतकऱ्यानें मिश्रखत किंवा भुइमुगाची पेंड यांचा वापर केला पाहिजे अशी एक अट घालण्यांत आली होती. पण मुंबई सरकारनें आतां ही अट रद्द करण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें हुकूमहि काढले आहेत. ज्या जमिनींतून अधिक उत्पन्न निघूं शकेल अशाच जमिनींना आर्थिक मदत मिळावी या हेतूनें सुरुवातीस ही अट घालण्यांत आली होती. तथापि कांहीं कांहीं जमिनी म्हणजे जंगलाच्या सरहद्दीजवळच्या जमिनी जंगलांतून येणाऱ्या गाळामुळें सुपीक झालेल्या असतात. तेव्हां त्यांना कृत्रिम खतांची जरूरी नसते असें आतां सरकारच्या निदर्शनास आलें आहे.

---

## पंजाब नॅशनल बँकेचा तंटा लवादाकडे सोंपविण्यांत आला

दिल्ली येथील पंजाब नॅशनल बँक लिमिटेड व तिच्या शाखा आणि त्यांतील नोकरवर्ग, ऑल इंडिया पंजाब नॅशनल एम्प्लॉइज फेडरेशन, दिल्ली व उत्तर प्रदेश बँक एम्प्लॉइज युनियन, आग्रा यांतील तंटा लवादाकडे सोंपविण्याचें भारत सरकारच्या मजूर खात्यानें ठरविलें आहे. यासाठी इंडस्ट्रिअल ट्रिब्युनल ॲक्टानुसार सरकारनें एक लवाद मंडळ नेमण्याचें ठरविलें असून कलकत्ता हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. सेन या मंडळाचे एकमेव सभासद असतील. बँकांतील कांहीं नोकरांना काढून टाकणें आणि पगार व महागाई भत्ता आणि काढून टाकलेल्यांस परत कामावर घेणें, इत्यादि कारणांवरून हा तंटा उद्भवला होता.

---


# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, (चेअरमन)
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

(मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित)

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

(स्थापना : १९१९)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर (जि. धारवाड)
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज (पे ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर, मॅनेजर

## टाटा कंपनीचें नवें डिव्हिडंड

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें ३१ मार्च १९५१ असेरच्या वर्षाचें डिव्हिडंड जाहीर झालें आहे. डिफर्ड शेअर्सवर ९३ रु. १० आ. ६ पै व ऑर्डिनरी शेअर्सवर १८ रु. डिव्हिडंड मिळणार आहे. गेल्या वर्षी अनुक्रमें ७९ रु. १५ आ. व १६ रु. असा डिव्हिडंडचा दर होता. वाढलेलें उत्पादन व वाढलेलें उत्पन्न, त्याचप्रमाणें जानेवारी १९५० ते जून १९५१ असेरच्या १८ महिन्यांसाठी दर टनी ११ रु. चा मिळालेला बोनस, ह्यामुळें डिव्हिडंड ज्यास्त मिळेल अशी शेअर बाजाराची अपेक्षा होती.

टाटा स्टील डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे.

**डिव्हिडंडमधील चढ-उतार**

| | प्रत्येक शेअरवर डिव्हिडंड ( रु. ) | |
|---|---|---|
| वर्ष | ऑर्डिनरी | डिफर्ड |
| १९३४-३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५-३६ | ६ | ७-८ |
| १९३६-३७ | १० | ३६-२-६ |
| १९३७-३८ | १५-८ | ७५-११-३ |
| १९३८-३९ | १८ | ९३-१०-५ |
| १९३९-४० | २५ | १४३ १४-७ |
| १९४०-४१ | २९ | १७२-१०-० |
| १९४१-४२ | २७ | १५८-४-४ |
| १९४२-४३ | २३ | १२९-८-९ |
| १९४३-४४ | २३ | १२९-८-९ |
| १९४४-४५ | २३ | १२९-८-९ |
| १९४५-४६ | २३ | १२९-८-९ |
| १९४६-४७ | १९ | १००-१३-४ |
| १९४७-४८ | १४ | ६४-१५-० |
| १९४८-४९ | १४ | ६४ १५-० |
| १९४९-५० | १६ | ७९-५-० |
| १९५०-५१ | १८ | ९३-१०-६ |

वरील आकड्यांवरून असें दिसून येईल कीं, डिव्हिडंडचा दर १९४१ सालीं सर्वांत जास्त, म्हणजे अनुक्रमें २९ रु. व १७२ रु. १० आ. असा होता.

### एलिझाबेथला रम्य बेटाचा नजराणा

१९३९ सालीं ब्रिटिश राजा जॉर्ज व राणी एलिझाबेथ ह्यांनीं कॅनडाला भेट दिली. व्हिक्टोरिया ( ब्रिटिश कोलंबिया ) कडे बोटीनें जातांना कोलंबियाच्या किनाऱ्यावरील शेंकडो बेटेंकडे पाहून एलिझाबेथनें "त्यांतील एकाद्या बेटाची मालकी आपल्याकडे असली तर किती छान होईल !" असे उद्गार काढले. ते लक्षांत घेऊन आतां प्रिन्सेस एलिझाबेथ कॅनडाला ऑक्टोबरमध्यें भेट देणार आहे, त्यावेळीं तिला जॉर्जिया सामुद्रधुनीतील तीन एकर क्षेत्राचें एक रम्य बेट नजर करण्याचें ब्रि. कोलंबिया सरकारनें योजिलें आहे.

### भाडें नियंत्रण कायद्याची मुदत वाढणार

बॉम्बे रेन्ट्स हॉटेल अँण्ड लॉजिंग हाउस रेंट्स कंट्रोल अॅक्टाची मुदत आणखी एक वर्ष म्हणजे ३१ मार्च १९५३ पर्यंत वाढविण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

## स्वातंत्र्य दिनाच्या सुट्टीचा पगार

( इंडस्ट्रिअल कोर्टाचा निवाडा ) •

धुळें येथील दि न्यू प्रताप स्पिनिंग वीव्हिंग मॅन्युफॅक्चुरिंग लि. चे मालक व कामगार ह्यांच्या दरम्यान ता. २६ जानेवारी १९५१ रोजीं स्वातंत्र्य दिनाची सुट्टी देण्यावरून तो दिवस पगारी रजेचा दिवस धरावा ह्या कामगारांनीं केलेल्या मागणीवरून जो तंटा उपस्थित झाला होता, त्यासंबंधीं मुंबईच्या इंडस्ट्रिअल कोर्टानें जो निकाल दिला आहे त्यानुसार सदरहू दिवस बिनपगारी रजेचा म्हणूनच कामगारांनीं समजावें, असें सांगण्यांत आलें आहे. भारत व मुंबई सरकारांनीं स्वातंत्र्य दिनाची सुट्टी द्यावी अशी सूचना सर्व गिरण्यांना केली असली तरी त्या दिवसाचा पगार कामगारांना द्यावा ही सरकारची सूचना केवळ विनंतिवजा होती व ती विनंति न मानण्याचें मिलओनर्स असोसिएशननें ठरविलें होतें व त्यानुसार स्वातंत्र्य दिनाचा पगार द्यावयाचा नाहीं असें मालकांनीं ठरविल्याचें कोर्टांत मालकांतर्फे सांगण्यांत आलें. सर्व सरकारी नोकरांना ती पगारी रजा मिळाली त्याचप्रमाणें अमळनेरच्या प्रताप मिलनेंहि त्या दिवशीं पगारी रजा दिली असें राष्ट्रीय मिल मजदूर संघानें कामगारांतर्फे निवेदिलें.

### 'हिंदफिन'ला कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळालें

हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इनव्हेस्टमेंट लि. ला कामकाज सुरू करण्याबद्दल कंपनी नोंदणी-खात्याच्या अधिकाऱ्यांचा दाखला गेल्या आठवड्यांत मिळाला आहे. कंपनीच्या मॅ. एजंटांनीं सध्याच्या बिकट परिस्थितीतहि कंपनीच्या आर्टिकल्सनें आवश्यक ठरविलेले शेअर्स विकून त्याची रक्कम जमविली. कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाची पहिली सभा नागपूर येथें ता. ८ जुलै रोजीं होऊन श्री. पूर्णचंद्रराव बुटी ह्यांची कंपनीच्या अध्यक्षस्थानीं निवड झाली. कंपनीचे चालक श्री. बाबासाहेब भोंसुले ह्यांच्या कर्तृत्वाबद्दल आणि त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल सभेनें समाधान व्यक्त केलें. कंपनीला वाजवी दरानें ठेवी मिळण्यास कांहींच अडचण येणार नाहीं आणि तिचें नियोजित कार्य लवकरच मोठ्या प्रमाणावर सुरू होईल अशी अपेक्षा आहे. मेसर्स भोंसुले, श्रोत्री आणि कं. कडे 'हिंदफिन'ची मॅ. एजन्सी आहे.

### तहाच्या संभवामुळें जपानमध्यें नाखुषी

कोरियांतील युद्धतहकुबीमुळें जपानमधील व्यापारी व कारखानदार नाखुष झाले आहेत. युनायटेड नेशन्सच्या फौजांना लागणारें साहित्य शेजारचा जपान पुरवीत असे. हा धंदा बंद पडला तर त्यांचे भरमसाट नफेहि बंद पडतील आणि कित्येक फर्म्स गडगडतील.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवीवर दर साल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटीसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५० अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,६०,४६५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | ,१,५१,००० |
| ठेवी | रु. | ७५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना

असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—


१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.








## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

### संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगां-वरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिश्रखत यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गा-ड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळांचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.


हे पत्र पुणें, पेठ मांगुडी घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.